
# गांधी-विनोबा

(काल, आज आणि उद्या)

भाग-१



संपादक

डॉ. संदीप बी. काळे

गांधी-विनोबा (काल, आज आणि उद्या)

■ डॉ. संदिप काळे

■ प्रथम आवृत्ती – 27, फेब्रुवारी – 2024.

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

ISBN - 978-93-95494-66-3

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

# संपादकीय

गांधी-विनोबा (काल, आज आणि उद्या) या शिर्षकावरील प्रस्तुत ग्रंथाचे संपादन करताना मला मनस्वी आनंद होत आहे. गांधी विनोबा यांच्या विचारातील समकालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय परिप्रेक्ष्यातून विवेचन व विश्लेषण करण्याच्या उद्देशाने या ग्रंथाचे संपादन करण्याचा अल्पसा प्रयत्न करण्यात आला आहे. गांधी-विनोबा यांचा विचार समाजातील सर्वच स्तरापर्यंत पोहोचविण्यासाठी हा ग्रंथ अनन्यसाधारण ठरेल अशी अपेक्षा असून आपण सर्व त्याचे स्वागत कराल असा विश्वास आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर "गांधीवादी विचार" या ग्रंथाचे संपादनाद्वारे संपादकीय ग्रंथाची शृंखला आम्ही सुरु केली होती आणि आज "गांधी-विनोबा" (काल, आज आणि उद्या) या संपादकीय ग्रंथाद्वारे आमची एकूण ७५ संपादकीय ग्रंथ प्रकाशनाचा अविस्मरणीय, ऐतिहासिक व दुर्मिळ उपक्रम आम्ही पूर्णत्वास घेऊन जात आहोत याचा आम्हास अभिमान व गौरव वाटत आहे. विशेषतः गांधी-विनोबा यांच्या कर्मयोगाने पावन झालेल्या वर्धा जिल्ह्याच्या भूमीवर वावरताना त्यांचा विचार संपादकीय ग्रंथाच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्याची संधी मिळाली आहे त्यामुळे आम्ही स्वतःला धन्य समजतो.

प्रस्तुत संपादकीय ग्रंथ प्रकाशन उपक्रमास आमचे स्नेही तथा परम मित्र आदरणीय प्रा. विराग गावंडे यांची अजोड साथ अतुलनीय आहे. तसेच या उपक्रमात सहभागी सर्व संपादक म्हणून कार्य करणारे प्राध्यापक व संशोधक बंधु-भगिनी आणि ग्रंथ प्रकाशनाकरिता शोधनिबंध पाठविणारे संपूर्ण भारतातील विविध विद्यापीठांमधील प्राध्यापक तथा संशोधक विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद खऱ्या अर्थाने आमची ऊर्जा राहिला आहे.

गांधी-विनोबा (काल, आज आणि उद्या) या संपादकीय ग्रंथाद्वारे गांधी-विनोबा यांचा समग्र विचार काल, आज आणि उद्याच्या संदर्भांना अनुसरुन विशद करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.-गांधी-विनोबा यांना अपेक्षित उज्वल ग्रामीण विकास व स्वावलंबी भारत या संकल्पना तथा

त्यांची प्रासंगिकता यांचे विवेचन व विश्लेषण करण्याचा आमचा मानस आहे. अर्थातच आमचा संकल्पच आज प्रबळ बनत आहे. समकालीन लोकशाही व्यवस्था अधिक मजबुत करण्यात "मजबुती का नाम महात्मा गांधी" तथा "सर्वोदयाचे दुसरे नाव विनोबा" या उद्घोषणा निश्चितच प्रासंगिक आहेत अशी आमची प्रबळ धारणा आहे. गांधी-विनोबा (काल, आज आणि उद्या) हा ग्रंथ गांधी-विनोबा यांनी बघितलेले सुजलाम, सुफलाम भारताचे स्वप्न जनमानसात रुजविण्यास सहाय्यभूत एवढीच रास्त अपेक्षा व्यक्त करतो.

गांधी-विनोबा (काल, आज आणि उद्या) या शिर्षकावरील प्रस्तुत संपादकीय ग्रंथ प्रकाशित करताना आमचे मार्गदर्शक तथा माजी आमदार आदरणीय मा. प्रा. सुरेशभाऊ देशमुख आणि आमच्या यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धाचे सन्माननीय अध्यक्ष मा. श्री समीरभाऊ देशमुख यांचे मार्गदर्शन अत्यंत बहुमूल्य आहे. आमच्या महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेत्तर सहकारी यांचे प्रोत्साहन वैचारिक ऊर्जा प्रदान करणारे ठरले आहे. तसेच आमचे मित्र प्रा. विराग गावंडे सर संचालक, आधार पब्लिकेशन्स, अमरावती यांचे सहकार्य असल्यामुळेच या ग्रंथाची प्रकाशन प्रक्रिया पूर्ण करणे सहज साध्य झाले आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या संपादन प्रक्रियेत सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे, संशोधक व प्राध्यापक आणि स्नेहीजनांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

वर्धा
दि. २७ फेब्रुवारी २०२४


**संपादक**
**डॉ. संदीप बी. काळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
यशवंत महाविद्यालय, सेलू, जि. वर्धा


# Index


| S.No | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | गांधींचे रामराज्य एक विचार — **प्रा.डॉ. विकास कृष्णराव जुनगरी** | 1 |
| 2 | महात्मा गांधींचे अहिंसेसंबंधी विचार — **प्रा. सुरेश जे.भालेराव** | 4 |
| 3 | विनोबा भावे यांच्या दृष्टीकोनातून सर्वोदय — **प्रा. डॉ. साधना डी. वाघाडे** | 8 |
| 4 | वर्धा जिल्ह्याच्या ग्रामीण भागात स्वच्छ भारत अभियान यशस्वी करण्यात विविध घटकांची भूमिका - एक चिकित्सक अध्ययन — **डॉ. सुरेश एम. पवार** | 18 |
| 5 | आचार्य विनोबा भावे जी का 'सर्वोदय दर्शन' आज के दौर में भी प्रासंगिक — **लोकेश कुमार जोशी** | 25 |
| 6 | विनोबा भावे आणि भूदान चळवळ — **प्रा डॉ. राजू भा. खरडे** | 34 |
| 7 | नैतिक समाज आणि विनोबा भावे: एक अध्ययन — **डॉ . आशिष दि. काळे** | 39 |
| 8 | महात्मा गांधी यांची स्वराज्य संकल्पना — **डॉ. डी.एन. रिठे** | 45 |
| 9 | गांधी सूत्रातील "निर्भयता" — **संदीप तुंडूरवार** | 49 |
| 10 | वर्तमान परिक्ष्येपात विनोबा भावे यांचे विचार आणि भूदान आंदोलनांची प्रासंगिकता — **Dr. Jayashri Kapse** | 58 |
| 11 | पंचायत राज व्यवस्था आणि ग्रामीण विकासात महात्मा गांधीजींच्या विचारांचे योगदान — **Dr. Subhash Girde** | 67 |
| 12 | महात्मा गांधीजी यांच्या विचारधनाचा अभ्यास — **डॉ.संभाजी संतोष पाटील,** | 76 |

होते, ज्यामध्ये सर्वांसाठी समान राज्य असेल आणि ज्यामध्ये सर्वांच्या गरजा पूर्ण होतील, म्हणजेच त्यांच्या स्वराज्याच्या गाभ्यामध्ये भारतीय लोकांच्या कल्याणाची भावना दडलेली होती. सभ्यता तथापि, याचा अर्थ असा नाही की गांधीजींनी बाहेरून काहीही न शिकण्याचा सल्ला दिला किंवा बंदिस्त समाजाची कल्पना केली, उलट गांधीजींनी अनुभवाच्या कसोटीवर चाचणी घेण्याविषयी सांगितले, जेणेकरून भारत त्याच्या मूळ स्वरूपात टिकून राहील. स्वराज्याचे उद्दिष्ट आपल्याला सुसंस्कृत करणे आणि आपली सभ्यता अधिक शुद्ध आणि मजबूत करणे हे होते. सभ्यतेचा मूलभूत घटक असा आहे की आपल्या सर्व कामात, मग ते खाजगी असो किंवा सार्वजनिक, आपण धोरणांचे पालन करण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे आणि ही धोरणे "सर्व जन हिताय, सर्व जन सुखाय" या संकल्पनेशी संबंधित असावीत. गांधीजींचा हा विचार आजही भारताला दिशा देणारा आहे.

संदर्भ सूची

1.गांधी, एम.के. हिंद स्वराज्य, नवजीवन प्रकाशन,अहमदाबाद(1990)

2. मोदी, नृ. प्र. गांधी दृष्टी मानक,पब्लिकेशन प्रा. लिमिटेड,नवी दिल्ली(2007)

3. कुमार, बी. ए.गांधींचे चिंतन. व. म.खु वि, राजस्थान(2012)

4. विकिपीडिया स्वराज(2023)





# गांधी सूत्रातील "निर्भयता"

संदीप तुंडूरवार

प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय नागपूर.

## विषय पृष्ठभूमी

**"डर के आगे जीत है"** असं ठळकपणे युवकांवर बिंबवणारी आणि त्यांच्या मानसपटलाला कवेत घेऊ पाहणारी जाहिरात हमखास वसंत ऋतूत वाहिन्यांवर रतीब घालताना दिसते. युवा वर्गाला उत्पादनाच्या कैद्यात घेत त्यांच्या पुरुषार्थाला जणु आव्हानाच्या रूपात अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न ड्यु शितपेयाच्या जाहिरातीतून झळकताना दिसतो. जाहिरातीतून युवांच्या जोषाला मिळणारी उत्स्फूर्तता दाखवितानाच सोबत मात्र हे 'धाडस' करू नये ही मर्यादही त्यात दर्शविली आहे. 'जोश हवा पण धाडस नको' 'उत्पादन विकत घ्या परंतु पोटात रिचवल्यानंतर आपला पुरुषार्थ दाहक न बनवता तो थंड ठेवा' अशी विसंबवादी कृती जाहिरातीत दिसते. जग जसे तशी जाहिरात हे मग ओघानेच येते! माध्यमांच्या भावविश्वात संवेदनांना जागा नसते असतो, तो केवळ कृत्रिम उथळपणा! ज्या मधून समाज जिवंत असण्याची रुधिरे अस्तित्वात न न येता ती क्षयांनी बाधली जातात.

प्रत्यक्षातील जगात माणूस म्हणून जीवन व्यवहार करताना त्याला अनेकानेक प्रश्नांना भिडावे लागते. अथवा स्वतःवरील अन्यायाच्या परिमार्जना करिता पुढाकार घेऊन समान दुःखीतांचे संघटन तयार करून परिस्थितीला आव्हाने द्यावी लागतात. विशेषतः ज्या समुदायात व देशांमध्ये आपल्या पापाचे परिमार्जन करण्याकरिता ईश्वरी दुताचे आगमन होणार आहे हे ठसविल्या गेले असेल! तिथे निर्भयता, धाडस, शौर्य पुरुषार्थ हे पेरणे, रुजविणे फुलविणे घडविणे किती कष्टप्रद असेल याची साधी जाणीव सामान्यांच्या गावीही नसते. ही आस अशीच ठेवल्या गेली असती तर हिंदवी स्वराज्य प्रत्यक्ष आकार घेउ शकले नसते व पुढे जिजाऊ- छत्रपती -संभाजी हा पट उभा झाला नसता. तर, स्वातंत्र्याची वेदी तप्त करून गुलामीचा इतिहास पुसून विशाल नवभारताची तेजोमय पताका फडकविता येणे ही अशक्यप्राय ठरले असते. स्वओळखीतून मोहन घडत गेला व दोन साम्राज्यांतील अभेद्य पोलादी व्यवस्थेला तडाका देणारी सळसळत्या

युवकांची "निर्भयी" अहिंसक सेना त्याला उभारत आली. बालमोहन ते महात्मा असा गांधी प्रवास मग घडला. गांधींच्या सार्थ शताब्दी नंतरही जगाला अधिक औत्सुक्याचा प्रश्न कायम आहे तो म्हणजे मोहनदास करमचंद गांधी या नावाच्या माणसाने खेडवळ, दरिद्री, वंचित, सर्वस्व आत्मभान हरपलेला, अंधश्रद्धा व कुचाळक्या परंपरांनी बद्ध बणून संवेदनशीलता गमावलेला, गुलामीची जाणीव असुनी लढ्याचे बळ गमावून बसलेला आणि अनेकानेक विषमतावादी व्यवस्थेत विभागलेल्या समाजात निर्भयता आणणे किती जिकरीचे तेवढेच आव्हानात्मक कार्य होते हे पाहून त्यांच्या प्रतीची उत्सुकता अधिक वाढीस लागते. निर्भयता, धाडस पेलत ते समाजाच्या अंतरंगात मिश्रित करणे हे गांधी समोरील अडचण असण्यापेक्षा ती संधी होती. तिचे आविष्कारण स्वकृतीतून देत गांधींनी भारताचा इतिहासच बदलला नाही तर वैश्विक भूगोल निर्मितीला प्रमेयं पुरविले. दंडूकशाही कुलिनवाद, रंगवाद साम्राज्यवाद, गोळीबंद मानसिकता या माणूसपणाच्या विरोधात निर्भयता पेरून बद्ध व चिरडलेल्या लोकांमध्ये त्यांनी स्फूर्तीतेज ओतले त्यामुळे गांधी सूत्रातील निर्भयता हे सूत्र वेगळे व लौकिकवादी ठरते.

### गांधी सूत्रातील "निर्भयता"

निर्भयतेचा साधा सोपा सरळ अर्थ देताना गांधी म्हणतात 'भयापासून मुक्तता' म्हणजे निर्भयता. दडपणातून पृथक होऊन स्वतंत्र होणे म्हणजे भयमूक्ती. मात्र ही भयमुक्ती सहज शक्य अशी बाब नाही. जगातील हुकूमशहा, साम्राज्यवादी गोळीबंद हत्यारे हे नेहमीच दडपणाखाली वावरत असतात त्यांना भयगंडाने पछाडलेले असते व त्यातूनच ते नि:शस्त्र, निद्रिस्त व खुल्या वातावरणात श्वास घेऊ पाहणाऱ्यांवर सैन्य चालवून निर्घुणपणे खून, हत्या सत्र घडवून आणतात. त्यांची मानसिकता इतकी विचित्र बनलेली असती असते की ते शस्त्राच्या गराड्याविना व सैनिकाविना दोन पावलेही पुढे जाऊ शकत नाही. 12 एप्रिल 1919 च्या जालियनवाला बाग हत्याकांडाच्या घटनेकडे लक्ष वेधताना गांधी म्हणाले 'वैशाखी निमित्तानें हजारो शिख बांधव जालियनवाला बाग येथे नि:शस्त्र पोहचले होते. परंतु, जनरल डायरने आपल्या सैन्यशक्तीची मग्रुरता दाखवत जवळपास 1000 फैरी झाडल्या व हजारो शिख बांधव शहीद





झाले.[1] **(सुरेश द्वादशीवार,गांधीजी आणि त्यांचे टीकाकार,साधना प्रकाशन, पुणे,पृ.क्र.21)**1857 नंतरची ही माणुसकीला काळीमा फासणारी व आपल्या सैन्य शक्तीचे निर्लज्जपणे समर्थन करणारी घटना होती. या घटनेने गांधीही अंतर्बाह्य पार बदलून गेले "इंग्रजी शासन हे सैतानाचे राज्य होय" अशी टीका करीत त्यांनी 'हिंदकेसरी' ही उपाधी ब्रिटिश सरकारला परत केली. गांधींच्या मनावर ओरखडा उमटविणाऱ्या या घटनेने येथील जनभावना भयमुक्त कशा करता येईल या विचाराकडे त्यांनी अधिक गांभीर्याने पाहण्यास सुरुवात केली. भयमुक्ति, वीरश्री, पर्यायाने शौर्य, धाडस, पुरुषार्थ यांच्याशी निगडित आहे. वर्धेतील प्रसंग आहे गांधींच्या सोबत वावरणाऱ्या स्थानिक महिलांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध आम्ही कसे लढायला हवे? काय करायला हवे? असा प्रश्न उपस्थित केला. गांधी त्यावर उत्तरले आपली गल्लीबोळ ओलांडून रस्त्यावर जा व 'भारत माता की जय' 'दारूबंदी बंद करा' अशा घोषणा द्या म्हणजे तुमच्यात वीरश्री संचारल्याचे जाणवेल. महिलांनी तेच केलं व आपल्या घोषणातून 'निर्भयता' येऊ शकते याचा प्रत्यय त्यांना आला. सत्याचा विचार धरून ठेवत त्याला जन पातळीवर आणले की निर्भयता येते हे गांधी जाणून होते. त्यांचा दक्षिण आफ्रिका ते भारत हा प्रवास सातत्याने हेच दर्शवितो.

लाहनग्या मोहनला चोर,भूत -पिशाच्च याच सतत भय वाटायचं. या भयातून मुक्त होण्याकरिता राम नाम व रंभाची ते मदत घेत तर शालेय जीवनात मेहताब या मित्राच्या प्रभावाखाली येऊन निर्भय व्हायला मांसाहार सुरू केला.[2] **(मो.क.गांधी,आत्मकथा,नवजीवन प्रकाशन मंदिर,अहमदाबाद,2006.पृ.क्र.18)**मोहन ची भयापासून दूर जाणारी ही वाटचाल लक्षात घेतली तर त्यात केवळ विवेकता दिसत नाही तो अश्रध्देचा खेळ वाटतो. परंतु भयापासून ते भयवर्जन, भयदमण इथपर्यंत गांधी जेव्हा येतात तेव्हा त्यामध्ये त्यांची इच्छाशक्ती, विवेकमुक्ती मार्गाची कास धरण्यास आवश्यक परिश्रम करण्याची जोड दिसून येते. दक्षिण आफ्रिकेतील घटनांचा त्यांच्यावर पडलेला प्रभाव या वाटचालीत महत्त्वाचा आहे प्रिटोरिया स्टेशन वरील कडाक्याच्या थंडीतील ती रात्र त्यांच्या भयमुक्ततेचा प्रारंभ होता त्यांच्या मनाने कौल दिला एक तर सर्व सोडून भारतात परत जावे, अथवा येथील रंगभेदाच्या विरुद्ध आपला संघर्ष उभा करावा.मेरीत्सबर्ग ते प्रिटोरीया येथील प्रत्येक घटनेत

त्याना हे जाणवू लागले की रंगभेदाचा ब्रिटिश साम्राज्याचा घृणीत भाव किती तीव्र आणि सामान्य गौरवर्णीयात खोलवर रुजलेला आहे. एकीकडे चित्र असतानाच जर्मन, ब्रिटन येथील गोरवर्णीय विवेकी लोकांची याला संमती नाही हे सुद्धा गांधींच्या नजरेतून सुटले नाही व पुढे जाऊन जनभावनांमध्ये निर्भयता रुजविण्यात त्यांना यश आले[3].**(लुई फिशर,गांधी की कहाणी,सस्ता साहित्य मंडल प्रकाशन,नई दिल्ली,2012.पृ.क्र.22)** कस्तुरबांचा प्रश्न या बाबतीत फार मार्मिक होता. जेलमध्ये स्त्रियांनाही टाकणार व त्यांना पुरेसे योग्य जेवण मिळणार नाही तर आम्ही काय करायचे? गांधी म्हणालेत 'उपोषण' करा. हा मंत्र लक्षणीय ठरला व ब्रिटिश पोलिसांना नमावे लागले. छोट्या छोट्या घटनेतून गांधी निर्भयतेचे धडे देत आहेत परंतु हे धडे आफ्रिकेत गिरवील्या जात होते आणि त्याचे छोटेसे पडसाद भारतात उमटायचे पण त्याची व्यापकता मर्यादित होती. आफ्रिका व भारत यामध्ये तसे साम्य स्थळे नाही उलट विरोधाभासी स्थळे अधिक आहेत. असे असताना गांधी आफ्रिकेचा प्रयोग भारतात 1915 ला घेऊन आले व त्यांची हत्या होईपर्यंत ते निर्भयपणे जगलेत. ब्रिटिशांच्या अमानवी छळाला कंटाळून काही वीरांनी तर माफीनामा सादर केला व पुढे ब्रिटिशांच्या पेन्शनवर सुखनैवे जीवन जगलेत. तुलनेने भगतसिंग, चंद्रशेखर आज़ाद, सरदार वल्लभ भाई पटेल, जवाहरलाल नेंहरू, मौलाना आझाद, राम मनोहर लोहिया या असंख्य क्रांतीदूतांनी ब्रिटिश द्वेष, त्वेष, क्रौर्य सहन करीत निर्भयतेचा परिचय दिला. कितीतरी कोवळ्या तरुणांनी निर्भयता दाखवत उघड्या छातीवर ब्रिटिशांच्या गोळ्याचे झेलल्या व वीरगती प्राप्त केली. खुदीराम बोस सहित अनेकांच्या वीरगाथा आजही संस्मरणीय आहे. एका बाजूला गांधी नेतृत्वातील लढ्याला विरोध करीत ब्रिटिशांशी एकनिष्ठता दाखविणारा तथाकथित संकुचित धर्मवाद्यांचा गट होता जो स्वातंत्र्य आंदोलन कमकुवत करीत होता.तर, दुसऱ्या बाजूला सामान्य, शिक्षित, कायदेपंडीत, धर्म तत्त्ववेत्ते, वंचित समुहांचा गट आपल्या निर्भयतेच्या निष्ठा प्रखरपणे मांडून त्याचा प्रत्यय भारतीयांसमोर ठेवत होते ही सगळी अतर्क्य वाटणाऱ्या घटना होत्या. गांधींच्या जन्मापासून त्यांच्यात ईश्वर शक्तीचा प्रत्यय असणारे संदर्भ दिसत नाही असे असताना सामान्यांमध्ये आपली विचारमूल्य रुजविण्यात गांधींना विलक्षन यश मिळाले हे समजून घेतले तर 'निर्भयतेचे' तत्व लक्षात येऊ शकते.





**भारतातील गांधी संदर्भातील 'निर्भयतेच्या' ठळक घटना**

नीळ शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत गांधींनी 1917 मध्ये स्वतःला जोडून घेतलं, अन्यायकारक शेतकरी व मजूर गांधींच्या बाजूने उभे राहिलेत तसेच ज्यांचे हितसंबंध दुखावले होते त्यांना चंपारण्यत गांधींची उपस्थिती अमान्य होती. त्यातील एका टोळक्याच्या प्रमुखांनी 'गांधी एकटा सापडला तर त्याचा कायमचा काटा काढायचा असा पण केला व जाहीरपणे गांधीबाबत आपली तर्कटता देताना तो म्हणाला, गांधी डरपोक आहे जिथे जातो तिथे अनेक माणसाच्या घोळक्यांनी, सोबतीने फिरतो तो एकटा भेटला तर त्याला गोळी घालेन'[4] **(चंद्रकांत झटाले, मजबुती का नाम महात्मा गांधी,न्यू इरा पब्लिशिंग हाऊस पुणे, 2022. पृष्ठ क्र.23)** गांधींच्या कानावर ही गोष्ट केली ज्या धर्मशाळेत ते थांबले होते तेथून रात्री तीन वाजता उठून तयार होत दुसऱ्या गावातील एका घराजवळ जाऊन ते उभे राहिलेत. त्यांनी घराची कडी वाजवली व मारेक-याला उठविले व सांगितले की आता मी एकटा आहे तू गोळी घाल. कुणालाही कळणार नाही. मारण्याची भाषा करणारा भर्भगळीत होउन क्षमा याचना करू लागला. भारतातील गांधींच्या जीवनातील हा पहिला प्रसंग होता.कदाचित येथूनच गोळी घालण्याची भाषा सुरू झाली व ती अंतिमत 30 जानेवारी 1948 येऊन संपली. या सर्व प्रसंगात गांधी मात्र निर्भयतेने पुढे गेले ही घटना सार्वजनिक नव्हती त्यामुळे कदाचित भारतीयांना गांधींची निर्भयता समजता आलेली नसावी. मात्र चंपारण्यातील त्या दुसऱ्या घटनेने गांधींच्या निर्भयतेला विश्व पातळीवर प्रसिद्धी मिळाली आणि निर्भयतेच्या अस्त्राची म्हणतात जगाला लक्षातही घ्यावी लागेली. ती घटना घडते 18 एप्रिल 1917 ला मोतीहारीच्या मॅजेस्टेट समोर! गांधी विरूध्द सरकारी पक्ष तक्रारीचा पाढा वाचित आहेत. गांधीनी कायदा मोडला, अशांतता पसरवली व लोकांना ब्रिटिश सत्तेविरुद्ध भडकाविले. अशा आरोपांची जंत्री वाचल्या गेली. गांधींनी अत्यंत शांतपणे उत्तर देत मी कायदा मोडला नाही केवळ शेतकऱ्यांची बाजू घेतली हे स्पष्ट केले मॅजिस्ट्रेटने गांधीना जामीन घेण्यास सांगीतले त्यांनी तो प्रस्ताव धुडकावून लावला. ही घटना अभुतपूर्व व अनपेक्षित होती. माझ्या शेतकऱ्यांकरता मी तुरुंगात जाईन परंतु जामीन घेणार नाही.[5] **(जयंत दिवाण, चंपारण्याचा सत्याग्रह, अक्षर प्रकाशन, मुंबई 2016. पृष्ठ क्र.39)** हे शब्दबोल त्या वातावरणात विजेसारखे चमकले आणि सारीच वकील मंडळी,

ब्रिटिश अधिकारी, उपस्थित सामान्य जनता अवाक होउन पाहत राहीली. असा अनुभव आजतागायत कुठल्याही राजकीय नेत्यांनी व अन्य कुणी दिलेला नव्हता मॅजिस्ट्रेटला केवळ कोर्ट उठे पर्यंत गांधींना जाता येणार नाही या शिक्षेच्या बोळवणापर्यंतच राहावे लागले. असे नेतृत्व ज्याचा तेथील वंचित, शेतकरी, कष्टकरी, मजूर यांच्याशी सुतराम संबंध नव्हता तो विषमते विरोधात उभे राहतो त्यांच्या करिता विनाअट तुरुंगात जाण्याचा निर्धार करतो ही प्रगटलेली भावना आत्मग्लानी आलेल्या भारतीय समाजात नवचैतन्य पेटवणारी होती. ही चैतन्याची प्रकाशशलाका विश्वातील सधन, सुदृढ, साम्राज्यवादी देशात पसरली. भारतात मात्र या अध्यायाने निर्भयतेचे सूत्रपात झाले होते. जनतेने प्रत्यक्ष निर्भयता अनुभवली होती व त्यांच्यातील स्फुलिंग चेतविल्या गेल्याने निर्भयता काय असते याचा अनुमान घेत स्वतःत ती ओतून घेण्याच्या धडपडीला प्रारंभ झाला.

समकाळातील अत्यंत विषाद वातावरणात जे अल्पसे कवडसे आपल्याला निर्भयतेची साक्ष देताना अद्यापही दिसतात त्यामागे भारताच्या विचार विश्वात गांधींनी खोलवर रुजवलेली निर्भयतेची बीज जी आहे त्यामध्ये दिसून येते. एकात्म भारताला विरोध दर्शवून ज़ीना ने धर्मांध मुस्लिमांना प्रत्यक्ष कारवाई म्हणजे धार्मिक दंगली उसळविण्याला उत्तेजन दिलेत. कॅबिनेट मिशनच्या शिफारशीने आकारास आलेल्या व भारतीय स्वातंत्र्य आंदोलन चळवळीने स्वीकारलेल्या संविधान सभेवर बहिष्कार टाकण्याची घोषणा मुस्लिम लीगने केल्याने धर्मांधतेचा आगडोंब भारतात उफाळून आला. त्याचे महत्त्वाचे केंद्र मुस्लिम बहुल प्रांत आजचा बांगलादेश व पाकिस्तान हे होते या घटनेने कायदा, सुव्यवस्था मालमत्ता, जीवित या सर्वांचे प्रश्न उभे राहिलेत नौआखाली प्रचंड कत्तली, विटंबना, बलात्कार, अपहरणाच्या घटना वाढल्याने गांधींनी सेवाग्राम आश्रम सोडून नौआखाली कुच केले. मोजक्या साथीदारासह गांधींनी स्वतःला नौआखाली झोकून दिले. बंगाल प्रांतांची सूत्रे त्यावेळी सुहार्वदी या मुस्लिम लीगच्या नेत्याकडे होती तिथे मुस्लिम लीग व हिंदू महासभा संयुक्तपणे राज्य कारभार करीत होते तरीपण हिंदू महासभेच्या नेत्यांना हिंदूंचे संरक्षण करता आले नाही. गांधींच्या येण्यानंतर तेथील स्थिती पूर्णतः बदलली. काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांना हौतात्म्य पत्करावे लागले परंतु गांधींनी आपली शांती यात्रा कायम राखली. गांधी यात्रेच्या प्रभावामुळे आगस्ट 1946 मध्ये





उसळलेल्या दंगली सामन्य होउन तेथील वातावरण सामाजिक सौहार्दाकडे वळलेत.[6] **(चंद्रकांत वानखेडे,गांधी का मरत नाही,मनोविकास प्रकाशन,पुणे,2019.पृ.क्र.158)** जगाच्या इतिहासात या घटनेचे मोल अधिक आहे लार्ड माउंटबॅटन यांना गांधींचे वर्णन One Man Army असे करून गौरवावे लागले यामध्येच गांधींची निर्भयता, त्याग दिसून येतो. गांधींचे समकालीन स्वतःला त्याच उंचीचे वा त्याहून अधिक उंचीचे म्हणून घेणारे नेते असताना त्यांना दंगली- फाळणी या काळात आपल्या सुरक्षित घरातून बाहेर पडता आले नाही. उलट गांधी संपावा याकरिता करावयाच्या कटाची उभारणी आपल्या बंद खोलीत ते करत गेलेत याची परिणीती नंतर गांधी हत्येत झाली. गांधींचा समग्र प्रवास भयमुक्ततेच्या दिशेने जसा राहिला तसा येथील जनमानसात निर्भयता रूजविण्याचा राहिला. गांधी कृतीचे हे मूल्य आजच्या प्रसंगात जसे प्रसंगोचित आहेत तसेच ते लोपलेल्या निर्भयतेला जागृत करणारे आहे. कालखंड कुठलाही असो निर्भयता कमकुवत होत गेली की हुकूमशाही, धर्मशाही, बेबंधशाही, बजबजपुरी यांची वाढ होते. भारताच्या समग्र इतिहासात निर्भयतेचे शड्डू ठोकून जे उभे राहिलेत त्यांच्या स्मृती चिरंतन राहिल्यात. तथागत ,महावीर, नागार्जुनाचार्य, महात्मा बसवेश्वर, चक्रधर स्वामी, कबीर,तुकाराम शिवाजी, महात्मा फुले, महात्मा गांधी ही मोठी नामावली आहे. यातील क्रित्येकांना तर आपली जीवन आहुती द्यावी लागली मात्र ते तसूभर आपल्या निर्भयतेपासून विचलित झाले नाहीत. अलौकिक, संमोहक, अवतार या विशेषणापासून दूर जात जनमानसातील एक बनून सामान्यांशी नाळ जुळवत त्यांना जागृत केल्यामुळे गांधी व अन्यांच्या मागे जनसमुदाय उभा राहिला व क्रांती घडत गेली. आपल्या मागे हिंदू धर्माचार्यांच्या मागे असणार नाही एवढा मोठा लोकसमुदाय उभा केला. मुल्ला मौलवींच्या पाठीशी असणार नाही एवढा जनसागर मुस्लिमातून गांधींच्या मागे उभा राहिला. अस्पृश्य समाजाला घेऊन लोक संघटन उभे केले हे सर्व भारतातील उण्यापुऱ्या 33 वर्षांच्या कार्यकाळात. सत्याग्रह, उपोषण, सविनय कायदेभंग, मिठाचा सत्याग्रह,चले जाव या सर्व आंदोलनात ठळकपणे दिसली ती निर्भयता. असा निर्भतेचा अलोट लोकसागर तयार करणे हे ब्रिटिशांच्या शस्त्रबळाला दिलेले उत्तर होते. 'रणाविणा स्वातंत्र्य कुणा मिळाले' या दंभाला 'स्वातंत्र्य निर्मिती ही निर्भयतेतून येते व तीच चिरंतन

आणि शाश्वत ठरत असते' हे दिलेले प्रतिउत्तर गांधी सूत्रातील निर्भयतेचे प्रमुखतत्व होय. 'क्षमाप्राप्तीचे हक्कदार' होण्यापेक्षा 'निर्भयतेचे पाईक व्हा' हा दिलेला मूलमंत्र गांधी विचार सूत्रांचे सामर्थ्य होय.

**विषय सार**

निर्भयता हे विवेकवादी म्हणजेच लोकशाही मूल्य होय. गांधींची समग्र क्रांती लोकशाहीवर बेतलेली होती. राज्यव्यवस्थांचा गुणधर्म दंडसत्तांद्वारे भीती व दडपण निर्माण करणे हा असतो हे गांधी उमगून होते.बलाढ्य व्यवस्था शस्त्रबळाने संपृप्त असते व तिला माणूसपणाविषयी विषयी घृणा, तिरस्कार असतो त्याला निर्भयतेने पुढे जाणे हेच उत्तर राहू शकते. असे विशुद्ध शस्त्र कृती प्रवण राहू शकते हे गांधींनी दक्षिण आफ्रिकेतील अनुभवातून सिद्ध केले होते. कुठलेही सूत्र, सिद्धांत जोपर्यंत सिद्ध होत नाही तोपर्यंत त्या बाजूने जण उभे राहू शकत नाही त्यांच्या खात्री पटण्यातून लोक हळूहळू संघटन, आवाज यामध्ये रूपांतरित होत जातात. व्यवस्था शरण बनवतात अथवा अज्ञानी मतांमुळे ते कुणाच्यातरी कच्छपी लागून आपली निर्भयता गमावून बसतात. साधारणतः ईश्वर पातळीवर हे घडताना दिसते. ईश्वराचा कोप होईल त्यातून वंश, विरासत नष्ट होईल या भयाने पछाडल्याने धर्म व्यवस्था लोक व्यवस्थेचेनेहमीच शोषण करीत असते. गांधी ईश्वरांचा अवकाश सोडत नाही ते चेतनेला जीवित राखण्यात, मददगार या दृष्टीने घेतात. परंतु राज्य व्यवस्थेचा उन्माद, क्षतीग्रस्तता याला प्रत्युत्तर म्हणून निर्भयतेचे कवच धारण करायला सांगतात. लोक मनात ईश्वरी भाव जागृत ठेवून भयमुक्त ते कडे घेऊन जाण्याची त्याची शैली इतरांच्या मार्गापेक्षा वेगळी आहे गांधी याला सतमार्ग मानतात. गांधी प्रतिपादनातील हे सूत्र वर्तमानत समजावून, पटवून देण्याची गरज असताना ते होताना दिसत नाही, उलट ईश्वरी साक्षतेच्या मेळ्यात भयग्रस्तता अधिक जाणवू लागली आहे, त्यामुळे सर्वच धर्मीयांमधील व्यवस्थापनकर्ते भयवादी समूह, समाज असावा यावर काम करतांना दिसतात.आज जगभरातील लोकसमूहांना दोन पातळ्यावर निर्वीरपणे उभे ठाकणे गरजेचे आहे त्यातील एक ठोकशाही देणाऱ्या नेतृत्वांना निर्भयतेने सामोरे जाऊन लोकशाहीची बूज प्रस्थापित करणे व दुसरे ईश्वरी भयगंडातून मुक्त होत धर्माच्या व्यवस्थापनकर्त्यांचे मनसुबे उधळून लावणे. हजारो वर्षात क्वचित निर्भयतेतीची भाषा बोलणाऱ्या व कृतीत आणणाऱ्या व्यक्ती राहिल्यात. ब्रिटिशा सत्तेच्या तीनशे वर्षांच्या काळात गांधी





नावाचा माणूस उदयास येई पर्यंत लोक ओठांवर निर्भयता रूळलेली नव्हती. हे भारतीयांचे प्राक्तण, दैववाद की लोकसमूहाचा उपेक्षावाद हे समजून घेतले तरच निर्भयता तरू शकेल.



10 Jan Prajakti Kaul

वर्ष १५ वे

# महाराष्ट्र वार्षिकी २०२४

संपादक
तुकाराम जाधव
विवेक घोटाळे
मुक्ता कुलकर्णी

समकालीन
राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय
राजकारण

समकालीन राजकारण
महिला आरक्षण
जातनिहाय जनगणना
राज्यपाल-राज्य संघर्ष
पक्षांतराचा पेच

समकालीन
कळीचे प्रश्न

आरक्षणाचा पेच

प्रादेशिक
मागासलेपणा

शेती
सिंचन
दुष्काळ
शेतकरी
आत्महत्या

THE UNIQUE FOUNDATION
Social Intervention Through Education

वार्षिकी २०२४

# महाराष्ट्र

## समकालीन महाराष्ट्र


संपादक

तुकाराम जाधव । विवेक घोटाळे । मुक्ता कुलकर्णी



UNIQUE academy PUBLICATIONS

THE UNIQUE FOUNDATION
Social Intervention Through Education

UNIQUE academy PUBLICATIONS | THE UNIQUE FOUNDATION
Social Intervention Through Education


**प्रकाशक :**
**युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन्स प्रा. लि.**
१२०२/३९, वास्तू चेंबर्स, फर्ग्युसन कॉलेज
मेनगेट समोर, शिरोळे रस्ता, पुणे ४११००४.
मो. : ७७७५०८३३४४
**Email. :** publication@theuniqueacademy.com
**Website :** www.theuniqueacademy.com

**महाराष्ट्र वार्षिकी २०२४ (वर्ष १५ वे)**
Maharashtra Varshiki 2024
संपादक : तुकाराम जाधव । विवेक घोटाळे । मुक्ता कुलकर्णी

मूल्य : ₹ ४००/-

वितरणासाठी संपर्क
मो. ७७७५०८३३४४ । ८६०५९९३३४४

मुद्रित शोधन : अश्विनी घोटाळे (बोरगांवकर)
मुखपृष्ठ संकल्पना : अमोल पाटील
अक्षरजुळवणी व मांडणी : वैशाली गुप्ता । अमोल पाटील
मुद्रण स्थळ : ए.आर. प्रिंटर्स, पुणे.



विदर्भ

# प्रादेशिक असमतोल आणि राजकीय अर्थव्यवस्था

डॉ. संदीप तुंडूरवार । डॉ. भास्कर वघाळे
bhaskar99waghale@gmail.com

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात विदर्भ प्रदेशाचे मागासलेपण हा मुद्दा राज्य विधिमंडळ आणि लोकसभा निवडणुकांच्यावेळी चर्चेचा विषय बनत असून याच मुद्द्यावर वेगळ्या विदर्भ राज्याची मागणी राजकीय पक्ष आणि संघटनाकडून केली जात असते. विदर्भ हा ब्रिटिश काळापासून उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत मागासलेला राहिलेला आहे. खरे तर विदर्भाच्या मागासलेपणाची बीजे ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणातच रोवली गेली होती. विदर्भ हा दोन भागांत विभागला गेला होता. काही भाग निजामाच्या अधिकारक्षेत्रात होता तर काही भाग मध्य प्रांताशी जोडलेला होता. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू असताना विदर्भाचा महाराष्ट्रात समावेश करण्यात येऊन तत्कालीन सत्ताधाऱ्यांकडून विदर्भाच्या विकासाची आश्वासने दिली गेली. परंतु आज सहा दशकानंतरही आजतागायत झालेले सत्ताधारी ते आश्वासन व्यवहारात आणण्यात पूर्णपणे अपयशी ठरलेले दिसून येतात. प्रादेशिक असमतोलाच्या दृष्टिकोनातून बघितले असता उद्योगांचे, विकासाचे, रोजगाराचे, शिक्षणाचे, पर्यटक, सोयी-सुविधांचे केंद्र मुंबई, ठाणे, पुणे असेच राहिलेले आहे. विदर्भाकडे अपेक्षित प्रमाणात विकासाचा दृष्टिकोन ठेवण्यात आलेला नाही.

▶ ▶ ▶

▶ महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात विदर्भ प्रदेशाचे मागासलेपण हा मुद्दा राज्य विधिमंडळ आणि लोकसभा निवडणुकांच्यावेळी चर्चेचा विषय बनत असून याच मुद्द्यावर वेगळ्या विदर्भ राज्याची मागणी राजकीय पक्ष आणि संघटनाकडून केली जात असते. विदर्भ हा ब्रिटिश काळापासून उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत मागासलेला राहिलेला आहे. खरे तर विदर्भाच्या मागासलेपणाची बीजे ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणातच रोवली गेली होती. विदर्भ हा दोन भागांत विभागला गेला होता. काही भाग निजामाच्या अधिकारक्षेत्रात होता तर काही भाग मध्य प्रांताशी जोडलेला होता. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू असताना विदर्भाचा महाराष्ट्रात समावेश करण्यात येऊन तत्कालीन सत्ताधाऱ्यांकडून विदर्भाच्या विकासाची आश्वासने दिली गेली. परंतु आज सहा दशकानंतरही आजतागायत झालेले सत्ताधारी ते आश्वासन व्यवहारात आणण्यात पूर्णपणे अपयशी ठरलेले दिसून येतात. प्रादेशिक असमतोलाच्या दृष्टिकोनातून बघितले असता उद्योगांचे, विकासाचे, रोजगाराचे, शिक्षणाचे, पर्यटक, सोयी-सुविधांचे केंद्र मुंबई, ठाणे, पुणे असेच राहिलेले आहे. विदर्भाकडे अपेक्षित प्रमाणात विकासाचा दृष्टिकोन ठेवण्यात आलेला नाही.

राजकीय अर्थकारण कसे असू शकते याचा अनुभव विदर्भाने मागील सहा दशकात अनुभवला आहे. राजकीय नेतृत्व प्रदेशातील कुठल्या भागातून आलेले आहे. यापेक्षा कुठल्या भागातील वरचढ नेतृत्वाचा गट अधिक प्रभावशाली आहे व तो धोरण निश्चितीवर कसा आणि कुठपर्यंत प्रभाव टाकतो यावर अर्थव्यवस्थेची राजकीय दिशा निश्चित होत असते. विभागीय विकासामध्ये राजकीय नेतृत्वाची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाच्या प्रश्नाकडे पाहता राजकीय नेतृत्व हा कळीचा मुद्दा ठरल्याचे स्पष्टपणे जाणवते. २०१४ पर्यंत महाराष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या विदर्भातील नेत्यांना विदर्भाच्या अनुशेषाच्या प्रश्नावर फारशी गती दाखविता आली नाही. मात्र २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री बनल्यानंतर विदर्भातील विकासकामांवर मोठा प्रभाव पडला आणि अनुशेष कमी झालेला दिसून येऊ लागला. परंतु विदर्भातील पूर्वेत्तर भागात जी विकासाची गती दृष्टिक्षेपात पडते तेवढी पश्चिम विदर्भाच्या बाबतीत आढळत नाही. याचा परिणाम पूर्व विदर्भाचा तुलनेत पश्चिम विदर्भाचा अनुशेषाच्या वाढीवर दिसू लागला आहे. २०१९ मध्ये राज्याचे नेतृत्व उद्धव ठाकरे आणि त्यानंतर एकनाथ शिंदेकडे आल्यानंतर विदर्भाच्या विकासाची गती मंदावल्याचे दिसून येते. विदर्भाच्या अनुशेषातील सर्वात मोठा हिस्सा शासकीय नोकऱ्यांचा राहिलेला आहे. येथील लोकसंख्येच्या तुलनेत विदर्भाला शासन नोकऱ्यांमध्ये स्थान नसल्याने हा अनुशेष आजतागायत कायम असल्याचा दिसून येतो. तात्पर्य राजकीय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकासकामाच्या बाबतीत पक्ष बळकटीला आणि प्रतिमा संवर्धनाचा दृष्टीने उपयुक्तकारक ठरतो का यावर राजकीय नेतृत्वाचे कार्य मोजता येते. प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न त्या अर्थाने अंतर्भूत आहे.

## विदर्भाची राजकीय अर्थव्यवस्था

विदर्भाची अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टिकोनातून विदर्भातील सर्वात मोठा जिल्हा हा यवतमाळ जिल्हा असून कापूस उत्पादक जिल्हा म्हणून ओळखला जातो. १ मे १९६० पूर्वी मध्यप्रांताची राजधानी आणि हल्ली महाराष्ट्राची उपराजधानी असलेले शहर म्हणून नागपूर संत्रा उत्पादनासाठी, पर्यटनाची बाजू म्हणून व्याघ्र प्रकल्पासाठी प्रसिद्ध आहे. विदर्भातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत शहरीकरणाकरिता आणि औद्योगिकदृष्ट्या SEZ, MIHAN, कोराडी, खापरखेडा ऊर्जा प्रकल्प आणि बुट्टेबोरी पंचतारांकित औद्योगिक वसाहत सक्षम असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील तलावांचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध असणारा भंडारा जिल्हा हा धान उत्पादनासाठीही प्रसिद्ध आहे, सोबतच राईस मिलसुद्धा धान प्रक्रिया उद्योग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात चालतो. चंद्रपूर जिल्ह्यात खनिज संपत्तीबरोबरच पर्यटन क्षेत्रात ताडोबा अभयारण्यामुळे नावलौकिक असलेला जिल्हा आहे. तसेच औष्णिक ऊर्जा निर्मितीचे एकूण ९ प्रकल्प जिल्ह्यात असून त्यातून ३३४० मेगावॅट इतकी ऊर्जा निर्माण केली जाते. गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांत विदर्भातील सर्वाधिक वनसंपदा आहे. या

विदर्भातील विविध साधनांखालील ओलिताचे क्षेत्र (क्षेत्र हेक्टरमध्ये)

| क्र. | जिल्हा | एकूण लागवडी खालील क्षेत्र | पृष्ठभागीय | विहिरी | ओलिताखालील स्थूल क्षेत्र | ओलिताखालील स्थूल क्षेत्राची लागवडीखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अकोला | ४०९४५८ | १३६१३ | ३१७३० | ४५३२५ | ११.०७ |
| २ | अमरावती | ७४९९७४.८८ | ३७८३७.४० | १४३६४३ | १८४४११.०७ | २४.५९ |
| ३ | बुलडाणा | १०७१००६ | ४६६१ | ४०६४६ | २१६६३६ | २०.२३ |
| ४ | वाशिम | ३०४५०१ | १५५१ | ११२३७ | २५२९१ | ८.३१ |
| ५ | यवतमाळ | १०८०९२२ | १४४५२३ | ६२२४० | २०६७६३ | १९.१० |
| पश्चिम विदर्भ | | ३६१५८६२ | १९२१७५.४ | २९१८९६ | ६७८४२६.१ | १८.७६ |
| ६ | नागपूर | ६६०४०७.६ | ५९३०० | १५०६०९.६ | ३०४०२८.६ | ४६.०४ |
| ७ | भंडारा | २५७८५९.१६ | ७०९३८.२८ | ५७२१४.२३ | १६३८०४.७० | ६३.५२ |
| ८ | गोंदिया | २३२९४१ | ५८३११ | २८१२९ | १४४५६३ | ६२.१० |
| ९ | गडचिरोली | २३१६८५.३६ | ५८३७८.३० | १५६५७.८३ | ८९१५९.७२ | ३८.४८ |
| १० | चंद्रपूर | ५५२७२८.९२ | ७०२२४.४५ | ३७४४४.११ | १४५९९७.५२ | २६.४० |
| ११ | वर्धा | ४६२६६७.१ | ५१२७७ | १९०१८७.५८ | २६१५७४.४ | ५६.५४ |
| पूर्व विदर्भ | | २३९८२८९ | ३६८४२९ | ४७९२४२.४ | ११०९१२८ | ४६.२४ |
| विदर्भ एकूण | | ६०१४१५१ | ५६०६०४.४ | ७७११३८.४ | १७८७५५४ | २९.७२ |

येतात. ८१.२६ टक्के लागवडीखालील क्षेत्र जिरायती स्वरूपाचे आहे. त्यामुळे या क्षेत्रात एकच पीक घेता येते.

राज्यातला प्रादेशिक असमतोलचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने १९८३ साली अर्थतज्ज्ञ व्ही. एम. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत केली (Fact Finding Committee). राज्याचा संतुलित विकास करण्यासाठी विविध विभागांना साधनसंपत्तीची गरज ₹३१८७ कोटी आहे असे दांडेकर समितीच्या अहवालाने सांगितले. त्यात सर्वाधिक वाटा (३९.०० टक्के) विदर्भाचा आहे. समितीच्या अहवालानुसार राज्यातील सिंचनक्षमता ४११४.२८ हजार हेक्टर होती पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ १५८०.५ हजार हेक्टरने मागे होता. १९८५-१९८६ मध्ये पश्चिम महाराष्ट्राची सिंचनक्षमता विदर्भापेक्षा ३०.१८ टक्क्यांनी अधिक असल्याबाबत प्रभूसीता आणि पी.सी सरकार यांच्या अहवालात नमूद आहे. १९९४ मध्ये निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्रातील एकूण सिंचन क्षेत्रातील अनुशेष ₹७४१८ कोटी होता. त्यात विदर्भ विभागाचा वाटा हा ₹४०८३ कोटी (५५.४०) इतका होता. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भातील सिंचन अनुशेष ₹३५३३ कोटींनी (४७.६३ टक्के) जास्त आहे. जून २०१० मध्ये विदर्भाच्या सिंचनाचा अनुशेष ११,५८,०१० हेक्टर एवढा आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत हा अनुशेष दिवसेंदिवस वाढत चाललेला दिसून येतो. सिंचन क्षेत्रात २०१० मध्ये विभागवार झालेली वाढ कोकण ४,३३,९२० हेक्टर (४९.४० टक्के) पुणे ३६,४०,०१० हेक्टर (९९.३७ टक्के), नाशिक - २१,१९,३०० हेक्टर (५७.९४



टक्के), मराठवाडा - २२,७५,१७० हेक्टर (४७.८४ टक्के) अमरावती - ८,५२,७९० हेक्टर (२७.१८ टक्के), नागपूर - ११,६५,०८० हेक्टर (५९.१७ टक्के) अशी आणि एकूण विदर्भात २०,१७,८७० हेक्टर (३९.५१ टक्के). या माहितीवरून विदर्भात सिंचनात झालेली वाढ पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत फारच कमी आहे. विदर्भात विहिरींद्वारे होणारे जलसिंचनही इत्तर विभागांच्या तुलनेत फारच कमी आहे. अपवाद फक्त कोकण विभागाचा आहे. ३१ मार्च २०११ रोजी कृषिपंपाचा अनुशेष राज्यात ४,८५,४८३ आहे. त्यात विदर्भाचा कृषिपंपाचा अनुशेष ३,५९,८५६ एवढा आहे. यावरून लक्षात येते, उर्वरित प्रांताच्या तुलनेत विदर्भाची अत्यंत वाईट अवस्था आहे.

वर्धा, वैनगंगा, पैनगंगा व प्राणहिता या विदर्भातून बारमाही वाहणाऱ्या मोठ्या नद्या आहेत. यांपैकी एकाही नदीवर मोठे धरण बांधून विदर्भाची सिंचनविषयक समस्या निकालात काढावी असे राजकीय नेतृत्वाना कधी वाटले नाही. वैनगंगेवर 'गोसीखुर्द' या धरणाची उभारणी करण्याचे काम राजीव गांधी सरकारने हाती घेतले होते. मात्र ते वेळेत पूर्ण झाले नाही. वर्धेवर धरण झाले, पण कालवे झाले नाहीत. आंध्र प्रदेशच्या राजशेखर रेड्डी सरकारने 'प्राणहिता' ही वर्धा व वैनगंगेच्या संगमानंतर तयार होणारी संपूर्ण महानदी वळवली. त्यासाठी प्राणहिता- चेवेल्ला सुजला श्रवंती या योजना अस्तित्वात आणल्या. नंतर त्या प्रकल्पास कालेश्वरम असे नाव देण्यात आले. मात्र एवढ्या मोठ्या नदीच्या चोरीचा पत्ता तत्कालीन काळात महाराष्ट्र सरकारला लागलाही नाही. राज्याची नदी पळविली जाते आणि राज्य सरकारला त्याची माहितीही नसते. जर वरील नद्यांवर छोटे छोटे प्रकल्प तयार केले असते तर त्याचा परिणाम निश्चितच विदर्भाचा कृषिक्षेत्रावर सकारात्मक दिसून आला असता. विदर्भाची जलसिंचनाच्या बाबतीत इतर प्रदेशांच्या तुलनेत अत्यंत वाईट आणि गंभीर अवस्था आहे. शासनाने त्याबाबतीत प्रयत्न केलेले आहेत; पण कृष्णा खोऱ्याला भरपूर निधी देऊनही वारंवार निधी मागण्यात येत आहे. तुलनेने विदर्भातील प्रकल्पांकरिता सातत्याने मागणी करूनही विदर्भातील सिंचन प्रकल्प एकतर रखडले किंवा मंजूरच करण्यात आले नाही. विदर्भातील सिंचन प्रकल्पांना राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे मिळणारा निधी सातत्याने राज्यपालांचे निर्देश डावलून कृष्णा खोऱ्याकडे वळविला जात आहे. याबाबतीत राज्यपालांनी वारंवार निर्देश दिलेले आहेत की, निधी इतरत्र वळवू नये, तसेच उच्च न्यायालयानेही शासनाला फटकारलेले आहे. विदर्भातील जलसिंचनातील ३० टक्के पाणी औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांना लागते. त्यामुळेही शेतीच्या पाणीवापरावर मर्यादा येत असतात आणि ही वीज विदर्भापेक्षा पश्चिम महाराष्ट्राला अधिक दिली जाते. विदर्भात वापर जास्त असल्याने वा कायद्याने अनेक प्रकल्पांना वाजवी दरात उपलब्ध करून न दिल्याने अथवा त्यास ५ ते ३० वर्षांचा कालावधी लागत असल्याने अनेक प्रकल्प रखडले आहेत. उदाहरणार्थ - १९८३ पासून हुमन प्रकल्प रखडला आहे. सद्य:स्थितीत विदर्भात १४७ सिंचन प्रकल्प या जमिनीमुळे अडलेले आहेत. या प्रकल्पांची सिंचनक्षमता १५१७.५७७ हेक्टर आहे. राज्यात प्राथमिक अवस्थेत असलेले मोठे व मध्यम १८ प्रकल्प आहेत. त्यापैकी विदर्भातील सात प्रकल्प आहेत. त्याचे कारण वनजमीन उपलब्ध न झाल्यामुळे आहेत. २५ टक्क्यांहून कमी खर्च झालेल्या प्रकल्पांची संख्या राज्यात ४८ आहे. त्यापैकी एकट्या विदर्भात प्रकल्पांची संख्या [illegible]५ आहे. त्यामुळे सिंचनक्षमता कमी आहे. शिवाय, विदर्भ पाटबंधारे विभागाला उपलब्ध कर्मचाऱ्यांचा तुटवडा आहे. त्यामुळे वेळेवर कामे होत नाहीत. पाटबंधारे विकास महामंडळात ८४ उपअभियंते, ३७१ शाखा अभियंत्यांची पदे रिक्त आहेत. एकंदरीत विदर्भातील सिंचनक्षेत्रातील अडचणी वनजमिनी कायद्याचा निधी पळविणे आणि पूर्ण निधी दिला जात नाही. शिवाय, त्यातील भ्रष्टाचार हेही कारण पुढे आलेले दिसून येते.

## कृषी क्षेत्र

दांडेकर समिती अभ्यास अहवालानुसार, भूविकास मागासलेपणाचे एकूण मूल्य ₹८३१९.१४ लाख होते. त्यात विदर्भाचा वाटा ₹१९६८.१२ लाख, तर पश्चिम महाराष्ट्रात ₹४४९३.९९ लाख होते. पश्चिम महाराष्ट्रातील प्रमाण जास्त असण्याचे कारण पिकाखालील जमीन तिथे जास्त होती. बांधबंदिस्तीची एकूण ₹८९०३.५०

विदर्भाच्या धानपट्ट्यात तिन्ही पिके बुडाली असताना केंद्र सरकारकडे मदतीची विनंती केली नसताना विदर्भातील शेतकऱ्यांना चुकीची माहिती देणे, पर्यावरणाचे संतुलन न राखता अदानी पॉवर कंपनीला चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबाच्या समृद्ध जंगलाची कत्तल करून फक्त कोळसा काढण्याची परवानगी देणे, विदर्भाला दिल्या जाणाऱ्या विजेच्या, दुप्पट वीज निर्माण करून मुख्य पुरवठा विकसित भागाकडे नेऊन, चंद्रपूरला राज्यातील सगळ्यांत प्रदूषित शहर म्हणून निर्माण करणे, अमरावती विभागातील सिंचनाचे पाणी वीज वापरासाठी घेऊन ४३ वीजप्रकल्प विकसित भागाला वीज पुरविण्यासाठी प्रस्तावित करणे, विकास निधीपैकी बहुतांश अविभाज्य (इनसेपरेबल) नसताना तो तसा घोषित करून फक्त विकसित प्रदेशात खर्च करणे, पर्यटनात फक्त विकसित प्रदेशातील स्थळे निवडणे, विकास प्रशासनात जिल्हा परिषद स्तरांवर उच्चाधिकाऱ्यांच्या ५०-५५ टक्के जागा न भरून विकासाची निर्णयप्रक्रिया खिळखिळी करणे; कृषिविकासात मृदा परीक्षण जलद गतीने पूर्ण केले जाणार अशी घोषणा करीत जिल्हा स्तरावर आवश्यक त्या परीक्षणशाळा व तंत्रज्ञ नसणे. अशा विविध कारणांनी विदर्भातील अनुशेष अजूनही भरून निघालेला नाही २०१४ ते २०१९ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असताना विदर्भातील अनुशेष भरून काढण्याचा प्रयत्न केला गेला, परंतु कृषी, उद्योग क्षेत्राला ज्याप्रमाणे चालना मिळायला हवी होती तशी मिळालेली दिसून येत नाही.

## संदर्भ


१) उखळकर आ. श्रा. १९८३, 'विदर्भ: आर्थिक विकास आणि अनुशेष, विदर्भ विकास महासभा प्रकाशन नागपूर, पृ.क्र. ५ -७

२) किमतकर मधुकर, १४ ऑगस्ट २०१० 'भविष्यातील विकासाकरिता वेगळ्या विदर्भ राज्याशिवाय अन्य पर्याय नाही विदर्भाला सुखी करा' साधना, पुणे, पृ.क्र. २३

३) कडूकर हेमंत, २००६ 'विदर्भाचे मागासलेपण आणि विदर्भ वैधानिक विकास मंडळ : एक अभ्यास, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे

४) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०२२ -२०२३ अर्थ व सांख्यकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई.

५) गावंडे देवेंद्र, १४ ऑगस्ट २०१० 'विदर्भाला सुखी करा', साधना, पुणे, पृ.क्र. ६९

६) महाबळ किशोर, २०१०, 'वेगळ्या विदर्भ राज्याची चळवळ दशा आणि दिशा', सुवर्ण महोत्सव विशेषांक, नवभारत पृ.क्र. ६९


७) खांदेवाले श्रीनिवास, १४ ऑगस्ट २०१०, 'विदर्भाने मातृभाषेचे ओझे परावलंबित विकासाचा रूपाने किती दशके वाहायचे' साधना, पुणे, पृ.क्र. २३

८) Government of Maharashtra, Oct 2013, Report of the High-Level Committee on "Balanced Regional Development Issues in Maharashtra' Planning department.


-----


- *लेखक भास्कर वघाळे हे श्री बिंझाणी नगर महाविद्यालय व मॉरिस कॉलेज, नागपूर येथे राज्यशास्त्राचे अध्यापन करत असून विदर्भाच्या राजकीय प्रक्रियेचे अभ्यासक आहेत.*
- *लेखक संदिप तुंडुरवार हे श्री बिंझाणी नगर महाविद्यालय व मॉरिस कॉलेज, नागपूर येथे राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख असून विदर्भातील प्रश्न आणि म. गांधी यांच्या विचाराचे अभ्यासक आहेत.*



**कोकण**

# विकासाचा पेच आणि प्रकल्प विरोधी राजकारण



प्रा. विराज महाजन
mahajanviraj73@gmail.com


पर्यटन,फलोत्पादन आणि मासेमारी या त्रिसूत्रीच्या आधारे कोकण विकासाचे उद्दिष्ट साध्य होत नाही. शिवाय कोकणातून स्थलांतराचे प्रमाणही वाढले .या दुष्टचक्रातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे भांडवलशाही विकास अशा समजुतीतून शासनाने मोठी गुंतवणूक असलेल्या औद्योगिक प्रकल्पांना प्राधान्य दिले. कोकणातील असलेली पड जमीन आणि समुद्रकिनारे या पार्श्वभूमीवर प्रकल्प जनतेवर लादले गेले. कोकण विकासाचा शाश्वत विकास आणि भांडवलशाही विकास अशा दोन दृष्टिकोनातून विचार केला जात आहे. यापैकी कोणता एक मार्ग योग्य, हा खरा प्रश्न आहे. कोकणाच्या शाश्वत विकासाचा विचार करणारे इथला निसर्ग, पर्यावरण याचा विचार मांडतात, याउलट भांडवलशाही विकासाची भलावण करणारे मोठमोठ्या प्रकल्पांमुळे कोकणचा कायापालट होईल असे मानतात. खरे तर विकासाची कोणती संकल्पना स्वीकारावी हा खरा पेच आहे. तो सोडविण्यासाठी आवश्यक असलेली समन्वयवादी भूमिका कोणी घेऊ इच्छित नाही ही खरी समस्या आहे.

# गांधी-विनोबा

## (काल, आज आणि उद्या)

भाग-२



संपादक

**डॉ. संदीप बी. काळे**

गांधी-विनोबा (काल, आज आणि उद्या)

■ डॉ. संदिप काळे

■ प्रथम आवृत्ती – 27, फेब्रुवारी – 2024.

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

ISBN - 978-93-95494-66-3

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्यां लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

# Index


| S.No | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | म. गांधीजी व ग्रामराज्याची संकल्पना एक अध्ययन<br>प्रा.डॉ. एन.आर. वर्मा | 1 |
| 2 | भूदान चळवळ आणि आचार्य भावे<br>डॉ.चंद्रमा दिनदयाल मेश्राम | 7 |
| 3 | गांधीवादी तत्त्वज्ञानाचे महत्त्व प्रा. डॉ. टी. एम. गुरुनुले | 12 |
| 4 | महात्मा गांधीजींची ग्रामराज्याची संकल्पना<br>प्रा.डॉ. संभाजी तनपुरे | 19 |
| 5 | सर्वोदय चळवळ : महात्मा गांधी, विनोबा भावे आणि जे पी यांच्या विचारांचे एक अवलोकन<br>डॉ. नरेंद्र व रघटाटे | 26 |
| 6 | गांधीजींचे पर्यावरण विषयक विचार आणि आजची पर्यावरण परिस्थिती डॉ. क्षमा चव्हाण | 36 |
| 7 | महात्मा गांधी आणि अहिंसा<br>प्रा.डॉ. संतोष एस. मिसाळ | 43 |
| 8 | महात्मा गांधीजींच्या विधायक कार्यक्रमातील ग्रामोद्योग<br>डॉ.अनुप्रिता जे.मापारी | 48 |
| 9 | महात्मा गांधींची तत्त्वे, प्रथा आणि श्रद्धा<br>प्रा.नंदकुमार बाबुराव बानाटे | 52 |
| 10 | भूदान चळवळ - एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>डॉ. महेंद्र पांडुरंगजी गावंडे | 57 |
| 11 | विनोबा भावे यांचेराजकीय विचार डॉ. अरूण पेंटावार | 66 |
| 12 | विनोबांचे ग्रामस्वराज्या 'संबंधी विचार<br>प्रा. डॉ. हरीदास लाडके | 75 |
| 13 | महात्मा गांधी यांचा स्वच्छतेविषयक दृष्टिकोन<br>डॉ. रेवणनाथ काळे | 79 |

# सर्वोदय चळवळ : महात्मा गांधी, विनोबा भावे आणि जे पी यांच्या विचारांचे एक अवलोकन

डॉ. नरेंद्र व रघटाटे
सहयोगी प्राध्यापक, तत्वज्ञान विभाग प्रमुख श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
9822857575 , raghatatenba2122@gmail.com

**प्रस्तावना:**

'सर्वांचे कल्याण' हे जगातील कोणत्याही विकसनशील राष्ट्राचे अंतिम उद्दिष्ट जसे आहे तसेच समाजातील सामाजिक किंवा आर्थिक दुष्कृत्ये दूर करणे हे सुध्दा सामाजिक परिवर्तनासाठी अत्याधिक आवशक आहे. सर्वोदयाचे ('सर्वांचे कल्याण') तत्वज्ञान हे भारतीय समस्यांवर गांधीनी दिलेला रामबाण उपाय होता. सर्वोदय याचा विचार करता हा संस्कृत शब्द ('सर्व', आणि 'उदय' म्हणजे 'उगवता') या शब्द पासून तयार झाला असून ज्याचा अर्थ सामान्यत: ''सार्वभौमिक उन्नती'' किंवा ''सर्वांची प्रगती'' असा होतो, म्हणजे सर्वांचा उदय, सर्वांचे कल्याण असा अर्थ यात समावेश आहे.[१]

विसाव्या शतकात, सर्वोदयाचे राजकीय तत्वज्ञान हे गांधींजींच्या राजकीय विचारात एक महत्त्वाची भर होती असे म्हणता येईल. गांधी हे या पृथ्वीतलावर सर्वोदय विचारसरणीचे पहिले निर्माते होते असे आपणाला म्हणत येणार नाही. त्यांच्या आधी सर्वोदयाचे अनुसरण जगातील अनेक देशांनी केले होते. परंतु आधुनिक इतिहासात सर्वोदयासाठी किंवा सर्वांच्या भल्यासाठी महात्माजींची व्यावहारिक भूमिका ही लक्षात ठेवली पाहिजे. सर्वोदयाची सुरूवात ही वैदिक युगात तसेच पाश्चात्य समाजातही आढळून येते.[२] जसे, सर्वोदय हा भारताचा जुना आदर्श आहे. आपल्या ऋषिमुनींनी गायनात ते आहे – "सर्वेपि सुखिना: सन्तु". सर्वोदय हा शब्दही नवीन नाही. जैन ऋषी समंतभद्र म्हणतात – हे पवित्र स्थान तुझे आहे, सर्व संकटांचा अंत आहे, सर्वांचा निरंतर उदय आहे. ''हे सर्व ब्रह्म आहे", ''वसुधैव कुटुंबकं", किंवा आपल्या ''सोहम'' आणि ''तत्वमसी" च्या प्राचीन आदर्शांमध्ये ''सर्वोदय" ची तत्त्वे आहेत.[३] भगवद्गीतेनुसार सर्व प्राण्यांच्या कल्याणासाठीची कल्पना यात अनुस्युत आहे. या विचारसरणीचा महात्मा गांधींनी काही व्याख्याने व संबंधित स्फुटलेखनातून पुरस्कार केलेला दिसून येतो. त्यांनी १८ जानेवारी १९४८ च्या हरिजन वृत्तपत्र –अंकात सर्वोदयाचा हेतू आणि वैशिष्टये यांची सुस्पष्ट रूपरेषा मांडली आहे. जैन दर्शनातील विचार देखील यात अनुस्तुत आहे.[४]।

दादा धर्माधिकारी आपल्या 'सर्वोदय दर्शन' यात म्हणतात कि, 'शेवटच्या मध्ये' म्हणजे – हे देखील शेवटचे, सकाळी जितके, संध्याकाळच्या व्यक्तीला तेवढे

जेवढे पहिल्या व्यक्तीला, शेवटच्या माणसालाही तेच, त्यात समानता आणि अद्वैताचा घटक आहे, ज्यावर सर्वोदयाचा विशाल महाल उभा आहे.

पाश्चात्य समाजात, जसे ग्रीक राजकीय तत्त्वज्ञानातही ते अप्रत्यक्षपणे दुसऱ्या नावाने आढळते. परंतु भारतामध्ये सामाजिक–आर्थिक न्याय आणि सर्वांसाठी चांगले प्रस्थापित करण्यासाठी सर्वोदयाची कल्पना एम. के. गांधींनी व्यावहारिकपणे अंमलात आणलेली दिसते. सर्वोदयाचा आधार अहिंसा, शांती, समता आणि सत्य होता. सर्वांच्या प्रगतीची समान संधी निर्माण करणे हे सर्वोदयाचे मुख्य उद्दिष्ट होते.

सर्वोदय चा आदर्श अद्वैत आहे आणि त्याचे धोरण समन्वयात्मक आहे. याद्वारे त्यांना मानवनिर्मित असमानता संपवायची होती तसेच नैसर्गिक असमानता कमी करायची होती. प्रत्येक जीवाचा आदर आणि प्रत्येक व्यक्तीबद्दल सहानुभूती हाच सर्वोदयाचा मार्ग आहे. डार्विन म्हणतो– ''निसर्गाचा नियम आहे, मोठे मासे लहान मासे खाऊन जगतात''. हक्सले म्हणतात – 'जगा आणि जगू द्या'. सर्वोदय म्हणतो – ''तुम्ही इतरांना जगण्यासाठी जगता''. इतरांना आपले बनवण्यासाठी प्रेम आणि सद्भावना वाढवावि लागते, अहिंसा विकसित करावी लागेल आणि शोषण संपवावे लागेल याकरिता आजची आपली जी सामाजिक मूल्ये आहेत त्यात बदल करण्याचा विचार करावा लागेल हीच आजची गरज आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

अ) सर्वोदयाची गांधीवादी संकल्पना समजून घेणे.

ब) महात्मा गांधींनंतर सर्वोदय चळवळीसाठी विनोबा भावे व जे पी यांची भूमिका जाणून घेणे.

क) सर्वोदय चळवळ आणि संपूर्ण क्रांतीसाठी जेपींचे योगदान समजून घेणे.

**संशोधन पद्धती:**

संशोधनाचा अभ्यास विषय मुख्यतः महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्याशी संबंधित आहे. सर्वोदय चळवळीसंबंधी यांचा तुलनात्मक अभ्यास विश्लेषणात्मक पद्धतीने करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**सर्वोदय सिद्धांताची तीन उद्दिष्टे :**

एका आदर्श समाजातः (अ) सामाजिक आर्थिक समानता हवी तसेच कोणीही इतरांच्या प्रगतीच्या मार्गात अडसर राहणार नाही.

(ब) सर्वांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी पूर्ण स्वातंत्र्य असेल आणि

(क) समाजीक कामाकरिता तसेच याच्या प्रगतीसाठी समान संधी प्रदान करेल.

प्रश्न जेव्हा निर्माण होता की सर्वोदय आणि सत्याग्रह एकच आहे का? तेव्हा असे म्हणावे लागेल कि, सत्याग्रह आणि सर्वोदय या अशा दोन संकल्पना आहेत ज्या सत्याच्या संकल्पनांवर आधारित आहेत. गांधीजींसाठी, सत्याग्रह हे एक शस्त्र होते आणि

'सत्य हेच ईश्वर' [illegible]
[illegible]

**सर्वोदय चळवळीची वैशिष्टे :**

- आत्म-नियंत्रण
- शोषणमुक्त समाज
- सर्वधर्मसमभावरूप विकास
- सार्वजनिक लोकमतावर आधारित शासन
- शांततेचा पुरस्कार आणि त्यात हिंसेला स्थान नाही
- स्वयंशिस्त आणि स्वावलंबनावर विश्वास
- आर्थिक समानतेवर विश्वास
- कामानुसार कामगाराला समान वेतन [illegible]
- अध्यात्मवाद यावर चळवळीचा विश्वास
- सर्वोदयाचा स्वयंपूर्ण ग्राम व्यवस्थेवर विश्वास
- भूदान चळवळ (विनोबा भावे)
- सर्वोदय चळवळी अंतर्गत कोणतेही केंद्रीकृत राज्य अधिकार नाहे
- राजकारण हे सत्तेचे साधन नसून सेवा आणि सहकार्याची संस्था
- याद्वारे समाजात प्रेम, सत्य, बंधुता, अहिंसा आणि आत्मसंयमाची भावना [illegible] जाईल
- पक्षाची व्यवस्था किंवा बहुमताची सत्ता नसेल
- सर्वोदय समाजाला खऱ्या अर्थाने समाजवादी म्हणावे
- सर्वोदय समाज समता, बंधुता आणि स्वातंत्र्यावर आधारित
- सर्वोदय चळवळ म्हणजे सर्वांच्या प्रगतीसाठी कार्य
- शोषणाचे साधन या नात्याने कोणतीही खाजगी मालमत्ता नसणे

**सर्वोदय तत्वज्ञानाचे प्रमुख घटक :**

(१) मोबदल्याची समानता – सर्वोदयात "[illegible]" हा घटक [illegible] आहे. साम्यवादालाही मोबदल्यात समानता हवी आहे

(२) स्पर्धेचा अभाव – स्पर्धा [illegible] संपूर्ण इमारत अहिंसेच्या पायावर उभी आहे

(३) साधनांचे शुद्धीकरण – सर्वोदयात साधनांचे शुद्धीकरण महत्त्वाचे आहे [illegible] आहे आणि साधनेही शुद्ध आहेत

(४) अनुवांशिक वारसाचा त्याग [illegible] आपली शेती आणि [illegible]

अभेद्यतेची भावना विश्वस्ततेमध्ये अंतर्भूत आहे. उच्चभूंचा नाश करण्याचे त्यांचे धोरण राहिले आहे.

(५) **विकेंद्रीकरण** — सर्वोदयाला सत्ता आणि संपत्तीचे विकेंद्रीकरण हवे आहे जेणेकरून शोषण आणि अत्याचार टाळता येतील. केंद्रीकृत औद्योगिकीकरणाच्या या युगात हे अधिक आवश्यक झाले आहे.[७]

**सर्वोदयाचे गांधीवादी तत्वज्ञान :**

खरे पाहता, सर्वोदय चळवळीचे जनक हे महात्मा गांधी होय. दादा धर्माधिकारी, जयप्रकाश नारायण आणि विनोबा भावे हे सर्व सर्वोदय चळवळीचे समर्थक आणि सदस्य होते. या चळवळीचा मसुदा जयप्रकाश नारायण यांनी तयार केला होता. ही योजना प्रामुख्याने एस एन अग्रवाल यांनी प्रदान केलेल्या गांधीवादी योजना तसेच गांधीवादी नेते विनोबा भावे यांनी सादर केलेल्या सर्वोदयाच्या कल्पनेतून प्रेरित होती. सर्वांसाठी समानता, न्याय आणि स्वातंत्रावर आधारित भारतीय राष्ट्र बनवण्यासाठी विनोबांनी भूमिहीन गरीबांना मदत करण्यासाठी भूदान चळवळ सुरू केली आणि जेपींनी १९५४ मध्ये विनोबांच्या चळवळीला पाठिंबा देण्यासाठी सोशालिस्ट पार्टी सोडली.

सर्वोदय हा शब्द पहिल्यांदा महात्मा गांधी द्वारे वापरण्यात आला. सर्वोदय चळवळ म्हणजे सर्वांसाठी समानता, न्याय आणि स्वातंत्र असलेला आदर्श समाज घडवण्याचा मार्ग. जॉन रस्किन यांच्या राजकीय अर्थव्यवस्थेवरील समालोचनाच्या अनुवादाचे शीर्षक म्हणून, 'अनटू दिस लास्ट', टॉलस्टॉयचे 'देवाचे राज्य तुमच्या आत आहे', सविनय कायदेभंग, भगवदगीता, इशोपनिषद, बौद्ध, जैन आणि इस्लाम इत्यादी स्त्रोतांनी त्यांची सर्वोदयाची संकल्पना विकसित करण्यास मदत केली. गांधींनी स्वतःच्या राजकीय तत्त्वज्ञानाच्या आदर्शासाठी हा शब्द वापरला.

दक्षिण आफ्रिकेत वकील म्हणून काम करत असताना, श्री हेन्री पोलक या ब्रिटीश मित्राकडून गांधींना रस्किनची 'अनटू दिस लास्ट' (१९०४) या पुस्तकाची प्रत मिळाली. गांधींना आपल्या आत्मचरित्रात डर्बनची चोवीस तासांची ट्रेन राईड आठवते. त्यांनी जेव्हा पहिल्यांदा पुस्तक वाचले तेव्हा ते रस्किनच्या विचारांच्या ईतक्या प्रभावात होते की त्यांना अजिबात झोप येत नव्हती. या संदर्भात ते म्हणतात, "मी माझे जीवन बदलण्याचा निर्धार केला". रस्किनचा राजकीय–आर्थिक जीवनाचा दृष्टिकोन तीन केंद्रीय तत्त्वांवर आधारित होता —

१. सर्वांच्या भल्यामध्ये व्यक्तीचे भले सामावलेले आहे.

२. वकिलाच्या कामाचे मूल्य नाईच्या कामाइतकेच आहे कारण सर्वांना त्यांच्या कामातून उपजीविका मिळविण्याचा समान अधिकार आहे.

३. श्रमाचे जीवन, म्हणजे मातीची मशागत करणाऱ्याचे आणि हस्तकलाकाराचे जीवन हे जगण्यासारखे जीवन आहे.[८] गांधींनी याचा अर्थ असा घेतला. ते म्हणतात कि पहिला

मुद्याची त्यांना माहिती होती. दुसऱ्या संबंधीचा अर्थ त्यांना अंधुकपणे जाणवला होता, परंतु तिसरा कधीच त्यांच्या मनात आला नव्हता. ते म्हणतात कि 'टू दिस लास्ट' यात पहिल्यामध्ये दुसरा आणि तिसरा समाविष्ट होता याची जाणीव त्यांना "प्रकाशासारखे स्पष्ट झाले" या शब्दांनी करता येईल. लगोलाग चार वर्षांनंतर, १९०८ मध्ये, गांधींनी रस्किनच्या पुस्तकाचा त्यांच्या मातृभाषेत (गुजरातीमध्ये) अनुवाद केला तसेच त्या पुस्तकाला 'सर्वोदय' असे शीर्षक दिले. संस्कृत शब्द – सर्व (सर्व) आणि उदय (उत्थान) – ''सर्वांचे उत्थान" किंवा गांधींनी त्यांच्या आत्मचरित्रात ''सर्वांचे कल्याण" असा उल्लेख केला आहे.

गांधीजींनी, सर्वोदय तत्वज्ञानासंदर्भात सर्वांचे कल्याण आणि सर्वांची प्रगती असे समानार्थी शब्द म्हणून याचा अर्थ लावला. सर्वोदय हे नाव गांधींनी नव्या समाजाला दिले आहे. संपूर्ण मानव जातीचे आणि संपूर्ण जगाचे कल्याण यात सामावले आहे. त्यांनी सर्वोदय चळवळ सुरू केली ज्याला लोक त्यांच्या अहिंसा चळवळीच्या प्रयत्नांची जोड मानतात. अहिंसा आणि प्रेमावर आधारित नवीन भारताची स्थापना करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. सर्वोदयाची गांधीवादी संकल्पना म्हणजे, सर्वभौमिक उन्नती किंवा सर्व स्त्री–पुरुषांचे कल्याण. सर्वोदयवादात गांधींनी समाजाचा अध्यात्मिक उत्क्रांतीवाद मांडला आहे. जातीच्या समस्या, सांप्रदायिक दुष्प्रवृत्ती, आर्थिक विषमता आणि सामाजिक भेदभावांना तोंड देण्यासाठी, गांधीजींनी ही संकल्पना लागू करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक–आर्थिक दुष्कृत्ये रोखण्यासाठी त्यांनी पक्षविरहित लोकशाही आणि वर्गहीन समाजाची संकल्पना सर्वोदयाद्वारे मांडली.[९] गांधींच्या मते, सर्वोदय हा निव्वळ यूटोपिया नसून समाज आणि व्यक्तींची पुनर्रचना करण्याचे मार्गदर्शक तत्वज्ञान आहे. सर्वोदय सामाजिक–आर्थिक भेदभावाच्या आव्हानांना सामोरे जाण्याचा प्रयत्न करते.[१०] सर्वोदयाद्वारे काय साध्य होणार? तर या द्वारे शासनाने लादलेल्या बंधनांऐवजी व्यक्ती स्वतःहून नैतिक बंधने स्वीकारतील असे स्वाभाविकपणे वाटू शकते.

पाश्चात्त्य उपयुक्ततावादयांच्या मते 'अधिकाधिक लोकांचे अधिकाधिक आनंद (कल्याण' या विचारधारेला मागे टाकणारा 'सर्वोदय' हा विचार वाटतो. सर्वोदयात समन्वयाचा विचार महत्त्वाचा आहे. सर्व विचारांचा मेळ घालण्याची व त्यांना एकत्र आणण्याची शक्ती सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानात आहे. सर्वांचे आनंद हा विचार इथे केंद्रीकृत आहे आणि सर्वोदयी विचारातील सुखाची कल्पना नैतिक सुखाची आहे.[११] जागे व्हा व जगू द्या विचारापेक्षा इतरांसाठी जागे व्हा या विचारांचा व्यवहारात अवलंब करणे सर्वोदयाला अपेक्षित आहे.[१२]

**आचार्य विनोबा भावे यांच्या कृतीत सर्वोदय :**

विनायक नरहरी भावे जे आचार्य विनोबा भावे म्हणून ओळखले जाते, हे अहिंसावादी, स्वातंत्र्यासाठी लढणारे कार्यकर्ते, समाजसुधारक आणि आध्यात्मिक शिक्षक

होते. महात्मा गांधींचे उत्कट अनुयायी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विनोबांनी त्यांच्या सिद्धांतांचे समर्थन केले. विनोबा भावे हे भूदान यज्ञाचे संस्थापक होते ज्याला रक्तहीन क्रांती असेही म्हणतात, ही भारतातील स्वैच्छिक जमीन सुधारणा चळवळ होती. भूदान आणि सर्वोदय याची सुरुवात गांधीवादी विनोबा भावे यांनी १८ एप्रिल १९५१ रोजी पोचमपल्ली गावात (नलगोंडा तेलंगणा) केली होती. याचे कारण म्हणजे या काळात साम्यवाद हा त्याच्या शिखरावर होता. सर्वांगीण विकास, नैतिक मूल्ये आणि पारंपारिक तसेच अधुनिक ज्ञानाचे एकत्रीकरण यावर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. विनोबा भावे यांनी सर्वोदय या शब्दाचा दुहेरी अर्थ घेतला जसा, एक, सर्वोदय म्हणजे सामाजिक कट्टरता आणि भेदभाव दूर करून सर्वांसाठी आनंद निर्माण करणे आणि दुसरा म्हणजे, समता, देवत्व आणि दयाळूपणाने नवीन समाजाची स्थापना करणे. 'सर्वांचे भले' हाच मूलमंत्र यात सामावलेला होता.[१३]

"सर्वोदय" यात वर्गहीन, जातिहीन तसेच शोषणमुक्त समाजाची स्थापना हा मुख्य उद्देश होता, ज्यात प्रत्येक व्यक्ती आणि समूहाला त्याच्या सर्वांगीण विकासाचे साधन आणि संधी मिळते. विनोबा म्हणतात– "जेव्हा आपण सर्वोदयाचा विचार करतो, तसेच उच्च–नीच यावर आधारित भावनिक जातिव्यवस्था जी भिंतीसारखी आपल्यासमोर उभी राहते, ती मोडल्याशिवाय सर्वोदयाची स्थापना होणे शक्य नाही. सर्वोदय यशस्वी करण्यासाठी जातिभेद दूर करून आर्थिक विषमता दूर करावी लागेल. त्यांचे निर्मूलन करूनच सर्वोदय समाजाची निर्मिती होईल" सर्वोदयाला असा समाज हवा आहे की ज्यात सामाजिक वर्ग, धर्म, जाती, भाषेच्या आधारावर समाजाचा ऱ्हास होता कामा नये. ज्यामध्ये कमी–अधिक शारीरिक क्षमता असलेल्या लोकांना समाजाकडून समान संरक्षण मिळेल तसेच सर्वांना समान वेतन मिळण्यास पात्र मानले जाईल.

**सर्वोदय कार्यक्रम:** विनोबांनी समाजात सर्वोदयासाठी कार्य करण्याहेतू बहुआयामी योगदान दिले, जसे–

अ) अस्पृश्यता निर्मूलन ब) सांप्रदायिक ऐक्य निर्माण करणे क) शेतीचा विकास ड) महिला शिक्षण ई) खादी आणि कुटीर उद्योगांचा विकास फ) कामगार संघटनांची स्थापना भ) गायींची काळजी आणि संरक्षण.[१४]

**जयप्रकाश नारायण यांच्या कृतीत सर्वोदय :**

भारतात जयप्रकाश नारायण यांनी १९५० मध्ये सर्वोदय योजना तयार केली. ही योजना गांधी आणि विनोबा भावे यांच्या सर्वोदय कल्पनेने प्रेरित होती. १९५४ मध्ये बोध्दगया येथे झालेल्या सहाव्या सर्वोदय परिषदेपासून जयप्रकाश नारायण हे सर्वोदय चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते तसेच जीवनदानी बनले. या संदर्भात जेपींनी विनोबांना एका पत्रात लिहिले, "जीवनदानाच्या तुमच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून, मी भूदानयज्ञावर आधारित आणि ग्रामोद्योगांद्वारे टिकून राहणाऱ्या अहिंसक क्रांतीच्या

प्राप्तीसाठी माझे नम्र जीवन अर्पण करतो".[१५] या योजनेची वैशिष्ठे म्हणजे परदेशी तंत्रज्ञानापासून मुक्ती, तसेच जमीन सुधार कायद्याचा परिचय ही होती. तसेच या आराखड्यत कृषी, लघु व कुटीर उद्योगांवर प्रकाश टाकण्यात आला. यात ग्रामीण विकासाला प्राधान्य देऊन आर्थिक विकेंद्रीकरणावर भर देण्यात आला. स्वातंत्र्योत्तर भारतात, विनोबा आणि जेपी या दोघांनीही सर्वांच्या प्रगतीसाठी, विशेषत: दलित लोकांसाठी व भारताची पुनर्रचना करण्यासाठी सर्वोदयाला वाहून घेतले. सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी पारंपारिक समाजवादी पद्धतींवर त्यांचा गाढा विश्वास होता. समाजवादी पद्धतींच्या तुलनेत सर्वोदय मार्ग अधिक प्रभावी आणि मूळ असल्याचे त्यांच्या लक्षात आले आणि त्यांनी पक्षाचा राजीनामा दिला. विकासाच्या दिशेने सामाजिक बदल घडवण्यासाठी त्यांनी पक्षीय राजकारणापासून स्वत:ला अलिप्त ठेवले. समाजातील विषमता दूर केल्याशिवाय सर्वांचे भले होणे शक्य नाही. गांधीजींचे कट्टर अनुयायी म्हणून जेपी आणि विनोबा या दोघांनीही समाजजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. समाजवादाच्या पाश्चिमात्य अर्थाकडे दुर्लक्ष करून, भारतीय समाजात समाजवादी तत्त्वांचा प्रभाव पडणारे एक प्रभावी शास्त्र म्हणून सर्वोदय हा एक व्यावहारिक मार्ग आहे, हे त्यांच्या लक्षात आले. आचार्यांनी सर्वोदयाच्या संकल्पनेवर आपली मनोभावना व्यक्त केली,"आम्हाला सर्वांचे आणि स्वत:चेही कल्याण हवे आहे. पण त्यापैकी कोणाला प्राधान्य द्यायचे हा प्रश्न आहे. आपण ते इतरांच्या भल्यासाठी दिले तर आपली वृत्ती ही सर्वोदयाची असते." विनोबाभावे त्या सर्वोदयाला 'सर्वोत्तम धम' (धार्मिक जीवन) आणि सर्वोदयमिदम तीर्थम् (सार्वत्रिक आशीर्वाद) मानतात. जगातील सर्व धर्मांचा मूळ अर्थ, सर्व मानवांचे कल्याण, समृद्धी आणि आनंद प्रस्तावित करतो. अशा प्रकारे सर्वोदय जगातील सर्व धर्मांना जोडतो.[१६] हा महत्वाचा मुद्दा यातुन निघालेला येथे दिसतो.^

जेपींना सर्वोदयात समाजवादाचा खरा मार्ग सापडला. समाजवादी समाजाच्या त्यांच्या संकल्पनेत स्वराज्य, स्व–व्यवस्थापन, सहकार्य, समता, स्वातंत्र आणि बंधुता असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. समाजवादी समाज फक्त एका छोट्या समुदायातच शक्य होता जिथे लोक समानतेने एकत्र राहतात आणि एकमेकांना मदत करतात. केवळ अधिकाराचे विकेंद्रीकरण नाही तर आर्थिक विकेंद्रीकरणही व्हायला हवे असे त्यांचे मत होते. त्यांनी सत्य, अहिंसा, सहिष्णुता आणि समतेवर आधारित सर्वोदय समाजात ग्रामीण समाज सुधारणेसाठी स्वत:ला झोकून दिले. सर्वोदयाच्या विचारसरणीव्दारे अहिंसक मार्गाने सर्वांचे कल्याण होऊ शकते. भूदानयज्ञाला अध्यात्मिक आणि नैतिक आधार आहे हे जयप्रकाश यांना समजले.[१७] जेपीच्या जीवनदानाच्या आधी, डॉ. लोहिया यांनी ३० मार्च रोजी जेपींना लिहिले, "देश आणि पक्षाला हादरवण्याची वेळ जवळ आली आहे आणि तुमच्याइतकी ती कोणीही हलवू शकत नाही. केवळ

तुम्हीच देशाचे नेते आणि पुढील समाजवाद होऊ शकता."[१८] याची परिणती अशी झाली कि, सर्वोदय समाज बनवण्यासाठी त्यांनी कोवकोळच्या सोखोदेरा गावात ग्राम निर्माण मंडळ, सर्वोदय आश्रम स्थापन केला. यावरून शांतता आणि सहजीवन ह्याच सर्वोदयाच्या मुख्य कल्पना वा मुख्य शस्त्र होउ शकते असे म्हणावयास हरकत नाही.

सर्वोदयाचा इतिहास बघता असे म्हणता येईल कि, ही चळवळ फक्त भारतातच होती असे नव्हे तर भारता बाहेर सुद्धा याची पाळेमुळे दिसतात. ही एक सामान्य बौद्ध चळवळ होती ज्यामध्ये भिक्षू सहभागी होऊ शकत होते. आहेनामागे टयूडर अरीयारत्ने हे श्रीलंकेतील सर्वोदय श्रमदान चळवळीचे संस्थापक होते. नालंदा महाविद्यालयातील माजी उच्च माध्यमिक शिक्षक, त्यांनी १९५८ मध्ये पहिले श्रमदान शिबिर आयोजित केले, ज्यामुळे अखेरीस देशातील सर्वात मोठ्य अशासकीय संस्थेची स्थापना झाली.

**सर्वोदय चळवळीच्या मर्यादा :**

'सर्वोदय' ही वैचारिकतेने समृद्ध संकल्पना आहे तथापि, त्याचे अनेक तोटे सुध्दा आहेत, कारण चळवळीचे आदर्श प्रत्यक्ष आचरणात आणता येणे खुपच कठीन कार्य आहे. सर्वोदय चळवळ लहान समुदायांसाठी योग्य आहे आणि आजच्या वैविध्यपूर्ण आणि गुंतागुंतीच्या जगात याची अंमलबजावणी करणे हे खूपच आव्हानात्मक आहे.

- आधुनिक जगात औद्योगिकीकरण ही यशाची आणि विकासाची गुरुकिल्ली आहे.
- राज्य नसलेल्या समाजाच्या अभावामुळे अराजकता येऊ शकते.
- वि—केंद्रीकरण प्रत्येक संदर्भासाठी योग्य असू शकत नाही आणि अशा प्रकारे, सर्वोदय चळवळीचे आदर्श सार्वत्रिक करता येत नाहीत.[१९]

**निष्कर्ष :**

सर्वोदय चळवळीचे राजकीय तत्वज्ञान हे आधिभौतिक आदर्शवादावर आधारित आदर्श समाज निर्माण करण्याचा एक बौद्धिक मार्ग आहे. ते गांधींच्या अंतर्दृष्टी आणि कार्यावर केंद्रित आहे, ज्यांनी हा शब्द तयार केला. पक्षविरहित लोकशाही आणि स्वराज्य यांचे संयोजन हे भारतीय राजकीय विचारांच्या दृष्टिकोनातून एक उत्कृष्ट योगदान आहे. विनोबांसाठी, सर्व मानवांच्या निःस्वार्थ सेवेद्वारे परम परमेश्वराची आराधना हा सर्वोदयसमाजाचा एक मार्ग होता. महात्मा गांधींनी विनोबां संदर्भात कृतयोगी असा शब्द वापरला, जे महान कृत्यांमधून सुवर्णयुगाचा आरंभ करणारे होते. सर्वोदय चळवळीची समाजवादी धोरणे सभ्यतेच्या आधुनिक औद्योगिक प्रवृत्तीच्या विरोधात दिसू शकतात. तरीही, यात 'गावाच्या जमिनीच्या सामायिक मालकीची नवीन मूलगामी उद्दिष्टे जोडली गेली आहेत. खेड्यातील समुदाय हा न्याय आणि शांततेच्या दिशेने बदलत एक विकेंद्रित ग्राम कॉमनवेल्थची निर्मिती ही महत्वपूर्ण भुमिका यात दिसून येते. अहिंसक मार्गाने सर्वोदयाच्या माध्यमातून समाजवादी विचारांची अंमलबजावणी

करण्यासाठी सर्वोदयात जे.पी. मार्क्सवादी समाजवादापेक्षा गांधीवादी समाजवाद भारतात अधिक उपयुक्त आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात. समता, बंधुता आणि सर्वांच्या सर्वांगीण विकासाच्या प्रस्थापनेसाठी राजकीय विचारसरणीपेक्षा कृतीशील आणि सदैव सत्यशोधक राहणे हाच जगण्याचा मार्ग त्यांनी निवडला आणि गांधीं अस्तानंतर त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत सर्वोदयासाठी कार्य केले. अश्या प्रकारे विनोबा आणि जेपी या दोघांनीही समाजात प्रगतीशील बदल घडवून आणण्यासाठी तसेच आपल्या निःस्वार्थ सेवेसाठी संपूर्ण जीवन समर्पित केले. त्यांचे बलिदान असे वाया घालवता येणार नाही म्हणून आपण सुध्दा आधुनिक समाजात त्यांच्या आदर्शांना जपून त्यानुसार वागण्याचा संकल्प करायला हवा.

संदर्भ :

१. https%//en-wikipedia-org/wiki/Sarvodaya

२. वर्मा, व्ही. पी., महात्मा गांधी आणि सर्वोदयाचे राजकीय तत्वज्ञान, आग्राः लक्ष्मी नारायण अग्रवाल, १९८०, पृ.२६०.

३. https%//en-wikipedia-org/wiki/Sarvodaya

४. https%//vishwakosh-marathi-gov-in/34012/

५. https%//byjus-com/free&ias&prep/sarvodaya&movement/

६. https%//testbook-com/ias&preparation/sarvodaya&movement

७. https%//en-wikipedia-org/wiki/Sarvodaya

८. गांधी, एम के, माझा सत्याचा प्रयोग, आत्मचरित्र. पृ.४४

९. टंडन, विश्वनाथ, गांधीजींनंतरचे सर्वोदयाचे सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान, पृष्ठ १३

१०. मोहंती, जे.एन., सर्वोदय आणि अरबिंदो अ रि–रॅप्रोचेमेंट, गांधी मार्ग, नवी दिल्ली पीस फाउंडेशन, १९६०

११. https%//vishwakosh-marathi-gov-in/34012/

१२. https%//marathivishwakosh-org/50258/

१३. गांधी, एम.के. हरिजन, फेबृवारी १९४९.

१४. मजुमदार, धीरेंद्र, शासनमुक्त समाजकेअर, ट्रान्स. (अखिल भारतीय सर्वसेवा संग प्रकाशन, वाराणसी, १९५५) पृ.८

१५. नारायण, श्रीमान, ऋषी विनोबा (वाराणसीः अखिल भारतीय सर्वसेवा संग प्रकाशन, १९७२), पृ.११

१६. ^रावत, आर.के, विनोबाभावे यांचे सर्वोदयाचे योगदान, शांती संशोधन, खंड ३६ क्रमांक, मे २००४, पृष्ठ २५

१७. दासगुप्ता, नितीश, जयप्रकाश नारायण यांचे सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान, साउथ एशियन पब्लिशर्स, नवी दिल्ली, १९९७, पृ.७८
१८. रंजन, सुधांशू, जयप्रकाश नारायण (प्रोफेट ऑफ पीपल्स पॉवर) नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, पृ.१४२
१९. https%//testbook-com/ias&preparation/sarvodaya&movement
२०. गर्गे, एस. मध्ये.(संपा), भारतीय समाजविज्ञान कोश (खंड–,अभ्यंकर,आणि.सी. यांचा लेख ), पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, २००७
२१. जोशी, बी. आर., सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांतांचा कोश– राज्यशास्त्र, पुणे, हिरा पब्लिकेशन्स,२००७
२२. भोळे, भा.ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, नागपूर, पिंपळापुरे ॲड कॉ. प्रकाशक, २००३
२३. जयप्रकाश नारायण, समाजवादापासून सर्वोदयाकडे, १९५९